Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# रशिया युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला प्रभाव व संभाव्य संधी

**अश्विन सुरेश खांडेकर**
सहायक प्राध्यापक,भूगोल विभाग,
मनोहरभाई पटेल कला व वाणिज्य
महाविद्यालय,सालेकसा,जि.गोंदिया.

---

**प्रस्तावना –**

जगातील कोणताही देश स्वय:पूर्ण नाही. देशाच्या उदरनिर्वाहाचे साधन हे देशात आढळणाऱ्या संसाधनावर आधारित असले तरी सजिवांसाठी आवश्यक सर्वच संसाधने एखादया देशात संपूर्णत: दिसून येत नाही.देशाची भौगोलिक परिस्थिती, हवामान, भूरचना, वनसंपत्ती, मानव साधनसंपत्ती या घटकावर देशाची आर्थिक उभारणी निश्चित केली जाते.शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असला तरी अनेक उद्योगधंदे, व्यवयाय हे देखील देशाचा विकास दर उंचावण्यात महत्वपूर्ण हातभार लावतात. दैनंदिन जीवनात तंत्रज्ञानाच्या युगात मानवाच्या गरजा अपेक्षेपेक्षा अमाप प्रमाणात वाढत असून त्या तुलनेत साधनसंपत्ती ही मर्यादित स्वरुपात आहे. गरजांची पूर्तता करण्यासाठी विश्वातील प्रत्येक देश एक दुसऱ्यावर अवलंबून आहे.अधिक होणारे उत्पादन निर्यात करणे व आवश्यक असणारी साधने आयात करुन अर्थव्यवस्थेला बळकट करण्याचे कार्य केले जाते.कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था ही स्थिर नसून ती काळानुरुप बदलणारी असते.स्थल, कालपरत्वे अर्थव्यवस्थेचे बदलणारे रुप देशाला उच्चांक पातळीपर्यंत नेवून ठेवते.अर्थव्यवस्थेवर प्रभाव पाडणाऱ्या अनेक घटकांपैकी देशा देशातील आंतरिक कलह, संघर्ष व होणारे युध्द त्यापैकी एक आहे.

देशाच्या व्यापार क्षेत्रावर युध्दाचा पडणारा प्रभाव विपरित स्वरुपाचा असला तरी काही प्रमाणात त्यापासून वर्तमान व भविष्यकालिन संधीची उपलब्धता पाहायला मिळते. अर्थव्यवस्थेवर पडणारा ताण नकारात्मक व सकारात्मक परिणामाला प्रभावित करतांना दिसतो.देशा देशांत असणारी संघर्षाची स्थिती अर्थव्यवस्थेत बदल करणारी आहे. वर्तमानात रशिया व युक्रेन या दोन देशात सुरु असणारे युध्द याचे ज्वलंत उदाहरण आहे.

**रशिया व युक्रेन युध्दाची पार्श्वभूमी –**

युध्द हे कोणत्याही देशासाठी घातकच असतात. जगातील पहिले ( १९१४ – १८) व दुसरे ( १९३९ – ४५) महायुध्द, अनेक देशात झालेले खाडी युध्दासारखे संघर्ष देशातील लोकजीवन, उद्योगधंदे, व्यवसाय, सजिव या सर्व घटकांना उध्वस्त करणारे आहे.जगातील सर्वात मोठया आशिया खंडातील क्षेत्रफळाने विस्तृत असणारा देश रशिया, साधनसंपत्तीच्या जोरावर संपन्न व तंत्रज्ञानात अग्रणी असा देश आहे.जगातील जुन्या राष्ट्रांच्या यादीत रशियाचे नाव अग्रक्रमावर दिसून येते. त्या तुलनेत युक्रेन हा अलिकडे निर्माण ( १९९१) झालेला देश. अन्नधान्य उत्पादन व वैद्यकिय सेवेच्या शिर्षस्थानी युक्रेनचे नाव घेतले जाते. रशियापेक्षा आकाराने लहान असणारा युक्रेन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करतो.

Research Hub International Journal

रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश नैसर्गिक साधनसंपत्ती, व्यापार, वाहतुक,उद्योगधंदे, व्यवसाय व तंत्रज्ञान याबाबतीत जगात श्रीमंत देशाच्या समुहात मोडणारे आहेत. या देशा दरम्यान चाललेल्या युध्दात या देशांच्या अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असून अन्य देशांच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम झालेला दिसून येतो. त्याला भारत अपवाद नाही. आंतरिक कलहातून सुरु असलेल्या या प्रदिर्घ संघर्षात रशियाने वापरलेल्या ताकतीचा सर्वच स्तरावरुन विरोध केला गेला. अनेक देशांनी रशियातील उद्योगधंदे व कंपन्या यावर आर्थिक निर्बंध लादले. १९९१ ला स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या युक्रेनला रशियाच्या प्रभाव क्षेत्राचा एक भाग म्हणून पाहिले गेले. युरोपियन युनियन सोबत युक्रेन ने मुक्त व्यापाराचे करार केल्यास आर्थिक आपत्ती व देशाच्या विनाशाचा सामना करावा लागेल असे संकेत रशियाने दिले. याच पार्श्वभूमिवर दोन्ही देशात जमिनीच्या भूभागावर आपले अधिकार असण्याच्या वादातून संघर्षाच्या ठिणगीने युध्दाच्या रुपात परिवर्तन केले. दोन्ही देशामध्ये असलेला वाद नवा नसला तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचे परिणाम व प्रभाव व्यापारिक दृष्टीकोनातून अनेक देशांना प्रतिकूल आहेत.

**रशिया व युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम –**

रशिया आणि युक्रेन यांच्यातील वाद शिगेला पोहचून त्याचे रुपांतर युध्दात ( फेबुवारी २०२२) झाले. देशा देशा दरम्यान असलेल्या आयात निर्यातीचे धोरणावर प्रभाव पडून जीवनावश्यक वस्तूच्या आयात निर्यातीवर बंधने लादली गेली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरही याचा प्रभाव पडतांना दिसतो. कारण रशिया व युक्रेन या दोन्ही देशांशी भारताचे व्यापारिक संबंध आहेत.

**१. रुपयाच्या अवमुल्यनात घट –**

आंतरराष्ट्रीय व्यापार हा प्रामुख्याने डॉलरमध्ये केला जातो. यासाठी प्रत्येक देशाकडे डॉलर असतो.एखादया देशाच्या चलनाचा विनिमय दर हा डॉलरच्या तुलनेवर ठरत असतो. एखादया देशाकडे परकीय चलन साठयाचे असलेले प्रमाण व आयातीच्या तुलनेतील निर्यातीचे प्रमाण यावर हा दर निश्चित होतो. रुपयाच्या घसरणाऱ्या स्थितीनुसार डॉलर ला प्राप्त करण्यासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. त्यानुसार अगोदर ६७ रुपये डॉलर आता ७७ रुपये मोजून परदेशातील डॉलरच्या गरजेला पुर्ण केले जाते. जगातील अनेक देश उत्पादनाच्या खरेदी विक्रीसाठी डॉलर हे चलन वापरतात. जागतिक चलन म्हणून डॉलरकडे बघितले जाते. भारत हा जवळपास ८५ टक्के तेलाची आयात करतो. युध्दजन्य परिस्थितीत अधिकचे रुपये तेल आयात करण्यासाठी खर्च केले तर त्याचा प्रभाव परकीय चलनाच्या साठयावर पडतांना दिसतो.

सोने विकत घेणाऱ्याचे प्रमाणही अनिश्चिततेच्या काळातच अधिक असते. त्याचा प्रभाव आयात या घटकावर पडतो. या सर्व बाबीवर अधिक खर्च होत असल्याने भारतातील रुपयाची डॉलरच्या तुलनेत घसरण झाली. रुपयाच्या मुल्यात घट झाल्याने भारतीय अर्थव्यवस्थेवर व मानवी जीवनावर त्याचा विपरित परिणाम झाल्याचे दिसून येतो.

**२. वस्तुच्या किंमतीत वाढ –**

रशिया व युक्रेन यांच्यातील युध्दाचा सर्वात मोठा तोटा हा वस्तुंच्या किंमतीत मोठया प्रमाणात होणारी वाढ होय.रुपयाच्या अवमुल्यनामुळे इतर देशाकडून भारताने खरेदी केलेल्या वस्तुच्या किंमतीत

वाढ झाली.सौदी अरेबिया, अमेरिका व रशिया हे देश जगातील प्रमुख तेल उत्पादक देश आहेत. या देशाकडून भारत ८५ टक्के तेलाची आयात करतो.युध्दाच्या परिस्थितीमुळे तेल पुरवठयावर परिणाम होवून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किंमतीत वाढ झाली. याचा पेट्रोल व डिझेलच्या किंमतीवर सरळ प्रभाव पडतो. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे आव्हानात्मक असल्याचे अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सांगितले. १५ ते १७ टक्क्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर तेलाच्या किंमती वाढल्याने भारतात प्रति लिटर दहा रुपयांची वाढ दर्शविली गेली.प्रति बॅरल एक डॉलर कच्च्या तेलाची किंमत वाढल्यास जवळपास ८००० ते १०००० कोटीचा भार भारतीय अर्थव्यवस्थेवर पडतांना दिसतो.यांची झळ सर्वसामान्य जनतेला पोहचतांना दिसते.

भारत हा रशिया या देशाकडून नैसर्गिक वायुची ५६ टक्के आयात करतो. एकुण इंधन वापरात नैसर्गिक वायुचा वाटा हा देशात ६ टक्के आहे.नैसर्गिक वायू आणण्याची प्रक्रिया दीर्घ स्वरुपाची आहे. समुद्रमार्गे नैसर्गिक वायुचे स्थलांतर भारतात होते. लिक्विफाईड नॅचरल गॅस चे भारतात होणारे रुपांतर हे पीएनजी किंवा सीएनजी यामध्ये केले जाते. वीज उत्पादने, कारखाने, सीएनजी वाहने व घरगुती वापरासाठी याचा उपयोग होतो. रशिया व युक्रेन च्या युध्दामुळे एलएनजी च्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसते.युध्दात वापरणाऱ्या बॉम्बमुळे पाईपलाईन तुटली तर याचा प्रभाव तेल पुरवठयावर निश्चितच दिसून येईल.रशिया सर्वात मोठा निर्यातदार देश नैसर्गिक वायुच्या बाबतीत आहे. ऊर्जा क्षेत्राचे तज्ज्ञ नरेन्द्र तनेजा, प्रा.अरुणकुमार या अभ्यासकांनी याबद्यल धोका वर्तविला आहे.

भारत मोठया प्रमाणात रशिया व युक्रेन यांच्याकडून आयात निर्यात करतो.बहुमुल्य खडे, मोती आणि धातुची आयात रशियाकडून केली जाते. तंत्रज्ञानामध्ये वापरले जाणारे फोन आणि संगणक उत्पादनासाठी या भागांचा समावेश होतो. यांच्या किंमतीतही वाढ झाल्याचे दिसते.

देशातील तांदुळ, गहु व डाळीच्या उत्पादनात घट दिसून येते. रब्बी हंगामातील डाळ लागवड क्षेत्र व तांदळाच्या क्षेत्रात झालेली घसरण अर्थव्यवस्थेला नकारात्मक असण्याची चिन्हे आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर डाळीच्या किंमती वधारल्या असून बाजारपेठेवर परिणामकारक आहे.

रशिया व युक्रेन या देशातील युध्दामुळे अनेक वस्तुंच्या किंमती वाढून महागाईत भर पडली आहे. त्यात तांबे, ॲल्युमिनियम, शिसे, जस्त, गहू, दगडी कोळसा यांचा समावेश आहे.बिगरखाद्य वस्तुच्या किंमतीत झालेली वाढ घाऊक दरावरील महागाईत भर पडून १३.११ टक्के झाली आहे.केंन्द्रिय वाणिज्य व उद्योग मंत्रालय यांनी अलिकडेच ही दर नोंदविली. भाज्यांच्या महागाईचे प्रमाण व खाद्यपदार्थाच्या किंमती अनुक्रमे ३८.४५ व १०.३३ टक्के नोंदवली गेली.या युध्दामुळे ३१.५० टक्के वाढ इंधन व वीज दरात दिसून आली.

अर्थतज्ज्ञांच्या मते, अर्थव्यवस्थेपूढे महागाईचे मोठे संकट उभे आहे.वस्तुच्या निर्मितीसाठी कच्च्या मालाची उपलब्धता वेळेवर होत नसल्याने पंखे, शिवणयंत्रे, वनस्पती व खनिज तेल, साबण तयार करणाऱ्या कंपन्यांनी भाव वाढविले आहे.

देशातील इंधनाच्या बाबतीत अभ्यास करणारी मॉर्गन स्टनले या संस्थेने येणाऱ्या काळात विपणन कंपन्या इंधनाचे दर १५ टक्के नी वाढवतील असा अंदाज वर्तविला आहे. ग्राहकोपयोगी क्षेत्रातील कंपन्यांनी उत्पादन खर्चाच्या वाढीमुळे किंमतीतही वाढ केली आहे. हिंदुस्थान युनिलिव्हर, नेस्ले इंडीया

यांनी तर चहा, कॉफी, दुधाची भूकटी यांच्या किंमतीत ही वाढ झालेली आहे. पामतेल,दुध, कॉफी पॅकिंग साहित्य या सर्वांचे भाव एफएनजीसी क्षेत्रातील कंपन्यांनी वाढविले आहे. कच्चा माल टंचाई व उत्पादनाची किंमत यांचा परिणाम सर्वसामान्य जनतेला सहन करावे लागत आहे.

**३. गुंतवणूकीत घसरण –**

रशिया व युक्रेन युध्दाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील सर्वात मोठा परिणाम म्हणजे महागाईत झालेली वाढ होय. गुंतवणूकीवर या महागाईचा प्रभाव पडतांना दिसतो.दैनंदिन वापराच्या वस्तु महागल्यामुळे उद्योगपती, व्यावसायिक यांनी गुंतवणूकीकडे पाठ फिरविली आहे. रोजगाराच्या विविध उपलब्ध होणाऱ्या संधीवर याचा परिणाम जाणवतो.गुंतवणुकीत झालेली घसरण रोजगार उपलब्ध करुन देण्यास कारणीभूत ठरत आहे.त्यामुळे बेकारी, दारिद्रय यासारख्या समस्यात वाढ होवून देशाच्या विकास दरात तफावत जाणवते. अलिकडे गुंतवणूक करण्याचे प्रमाण दिसून येते.

**४. विकास दर कमी –**

कोरोनाच्या काळात देशाची खालावलेली अर्थव्यवस्था संपुर्ण जगाला परिचित आहे.काही दिवसांच्या फरकाने रशिया व युक्रेन चे एक महिन्यापेक्षा अधिक चाललेले युध्द देशाच्या विकास दरावर प्रभाव पाडणारे आहे.विकास दराचा संबंध मध्यम वर्गाशी असून त्याचा उत्पन्नावर विपरित परिणाम होतो. असंघटीत क्षेत्रावर झालेला प्रभाव अर्थव्यवस्थेला तडा देणारा असतो.अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार युध्दाच्या परिणामासाठी हे घटक महत्वपूर्ण आहे.

**५. विदेशातील भारतीय व्यापारावर विपरित परिणाम –**

दोन्ही देशांशी भारताचे व्यापारी संबंध असल्याने भारतीय नागरिक अनेक देशांमध्ये वास्तव्य करतांना दिसतात.भारतीय विद्यार्थ्यी व अनेक नोकरदार भारतीय या देशांमध्ये व्यापाराच्या उद्येशाने राहतात.भारतीय दुतावासाच्या मते, १४००० भारतीय रशियात असून वैद्यकीय व तांत्रिक अभ्यासक्रम करणारे जवळपास ५००० विद्यार्थ्यी तर व्यावसायिक हेतुने ५०० भारतीय आहेत, ते तांदुळ, मसाले, कॉफी, चहा अशा अनेक वस्तूच्या संबंधित व्यवसायात गुंतलेले आहेत.तर युक्रेनमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणारे २०००० विद्यार्थ्यी असून या देशांमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांच्या व्यवसायावर नकारात्मक परिणाम झाले. हे अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारे आहे.

**६. खाद्य तेलावर प्रभाव –**

युक्रेन हा सूर्यफुल तेलाचा जगातील सर्वात मोठा निर्यात करणारा देश आहे,तर रशिया दुसऱ्या क्रमांकावर येतो. दीर्घकाळ युध्द असल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम खाद्य तेलावर दिसेल.तेलाच्या किंमतीत वाढ होवून सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेर आहे.भारत ८० टक्के सूर्यफुल तेल युक्रेन व २० टक्के तेल रशियाकडून आयात करतो.या युध्दाचा परिणाम खाद्य तेलावर होवून युक्रेनकडून आयात थांबलेली आहे. रशियाने तर एका महिन्यात सहा लाख टन खाद्यतेल भारताला पाठविले.पामतेलाची ६० टक्के आयात भारत करतो.निर्यातीच्या कठोर नियमांमुळे इंडोनेशियाने आयात अडविली तर अर्जेटिनाने ही सोयाबिन तेलाची आयात थांबवून ठेवली.मागणी जास्त असल्याने पूरवठा कमी होत असतांना खाद्यतेलाच्या दरात वाढ झाली आहे.

**७. संरक्षणावर परिणाम –**

देशाच्या आंतरराष्ट्रीय सिमांच्या संरक्षणासाठी अत्याधुनिक शस्त्रात्रांची गरज आहे.रशियाकडून सर्वात जास्त शस्त्रे भारत आयात करतो. देशाच्या संरक्षण दलात रशियन बनावटीची ६० टक्के शस्त्रे असून लढावू विमाने, तंत्रज्ञानयुक्त उपकरणे, एस ४०० एअर डिफेन्स सिस्टीम भारताला पूरवठा करतो. या युध्दाचा परिणाम म्हणून रशियाकडून येणारी आयात तूर्तास बंद झाल्याने देशाच्या संरक्षण यंत्रणेवर प्रभाव पडण्याची चिन्हे आहेत. शस्त्रास्त्रांचा उत्पादक देश म्हणून रशियाकडे बघितले जाते. आंतरराष्ट्रीय संबंध व कराराद्वारे शस्त्रांस्त्रांची होणारी आयात देशाच्या लष्करांना महत्वपूर्ण सहकार्य करते.

**८. शेअर बाजारात घसरण –**

युध्दाचा प्रभाव जागतिक शेअर बाजारावर पडतांना दिसतो.वर्तमानात शेअर बाजारात झालेली घसरण लक्षात घेता अनेक गुंतवणूकदार व व्यावसायिकांनी भितीपोटी अधिक प्रमाणात घेतलेल्या शेअरची विक्री करण्यास सुरुवात केली आहे. याचा प्रभाव भारतीय शेअर बाजारावरही पाहायला मिळतो.शेअरचे होणारे निच्चांक शेअर बाजाराची होणारी उलथापालथ करणारी आहे.भारतीय गुंतवणूकदारांनी युध्दाच्या भीतीने नुकसान टाळण्यासाठी शेअर विकायला काढले आहेत.यामुळे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम पाहायला मिळते.

**९. समुद्रमार्गावरील दरात वाढ –**

पश्चिमेकडील राष्ट्र पूर्वेकडील देशांशी व्यापार करतांना अधिकांशत: समुद्रीमार्गाचा वापर करतात. या युध्दात नाटो स्विकृत देशांनी सहभाग घेतल्यास जहाज वाहतुकीच्या मार्गावर याचा प्रत्यक्ष संबंध पडतांना दिसतो. जहाज विम्याचे दर वाढले की,आयात निर्यातीवरील वस्तुंच्या किंमतीवर प्रभाव पडून युध्दजन्य प्रदेशातील वाहतुक मार्गाच्या निर्बंधावर परिणाम होवून अर्थव्यवस्थेत तफावत जाणवते.

**१०. रेपो दरात वृध्दी –**

देशातील किरकोळ चलनवाढ ही अधिक नोंदविण्यात आली असल्याने रेपो दरात वाढ झाल्याचे दिसते.उत्पादन, आयात – निर्यात, मागणी, पुरवठा व वस्तुंचे वधारलेले भाव याचा प्रभाव महागाईवर पडल्याने रेपो दर प्रभावित झाले आहे.भविष्यकालीन काळात चलनवाढीवर युध्दामुळे प्रभाव पडतांना दिसतो. कर्ज महागल्याने सर्वसामान्यांना फटका बसला आहे.

एकंदरित रशिया व युक्रेन युध्दामुळे भारतीय अर्थव्यवस्था प्रभावित झाली आहे.आयात निर्यातीच्या धोरणामुळे लागलेले कठोर निर्बंध, उत्पादनाचे प्रमाण कमी, मागणीचे प्रमाण जास्त त्या तुलनेत पुरवठा अल्प यामुळे व्यापार, उद्योगधंदयाची गती संथ झाली. पर्यायी अर्थव्यवस्था ढासळतांना दिसते.

कोरोनाच्या संकटातून सावरत असतांना भारताला युक्रेन – रशिया युध्दाचा सामना करावा लागतो.बदलत्या हवामानामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटले आहे. याच काळात युध्दामुळे इंधनाचे दर व अन्नधान्यही महाग झाले आहे. गव्हाचा पुरवठा करण्यास दोन्ही देश असमर्थ आहेत.त्याचा परिणाम गव्हाच्या किंमतीतही वाढ झाली आहे.उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा वापर होतो, त्यावरही युध्दाचा परिणाम दिसून येतो.

**रशिया युक्रेन युध्द व संभाव्य संधी –**

युध्दाचा परिणाम हा नकारात्मक असला तरी मोजक्या स्वरुपात काही देश व तेथील लोकांना या युध्दामुळे नवनविन संधी ही उपलब्ध होत असतात.

**१. निर्यातदारांच्या संख्येत वाढ –**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत डॉलरचे वाढलेले भाव निर्यातदारासांठी लाभदायक आहे.वर्तमानात युक्रेन व रशिया हे देश गव्हाचे सर्वात मोठे निर्यातदार देश आहेत.यांच्यात चाललेल्या युध्दामुळे अन्य देशांना गव्हाचा पुरवठा पुरेशा प्रमाणात करण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे भारतीय निर्यातदार सकारात्मकरित्या या बाबीकडे बघतील.या संधीचा फायदा घेत देशातील निर्यातदारांनी अन्य राष्ट्रांना गहू विकल्यास डॉलरच्या वाढलेल्या किंमतीचा फायदा यांना मिळेल.व्यापारिकदृष्टया हे उत्तम असले तरी गव्हाचे भाव राष्ट्रीय बाजारात वाढल्यास नवल नाही.परंतू या युध्दामुळे संभाव्य संधी म्हणून निर्यातदार मात्र उत्सुक असतील.

**२. क्रयशक्तिमध्ये वाढ –**

सर्वसामान्य लोकांच्या जीवनमानावर युध्दाचा प्रभाव पडतो. यासाठी रुपयाचे अवमुल्यन ही बाब तेवढीच कारणीभूत आहे.लोकांना रोजगाराची अत्याधिक आवश्यकता असल्याने त्यांची क्रयशक्ति वाढल्यास लोकांना आर्थिक फायदा अधिक होईल.अशाप्रकारच्या सोयी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. युध्दामुळे खालावलेली आर्थिक स्थिती उंचावण्यात काहीशा प्रमाणात हे घटक जबाबदार असू शकते. लोकांच्या हाताला आलेले कार्य, लोकांची कार्यक्षमता वाढण्यास कारणीभूत असते.

**३. उत्पादनक्षमतेत वाढीची शक्यता –**

देशाला लगतच्या रशिया कडून इंधन व कतार या देशाकडून अधिक प्रमाणात एलएनजी आयात करावी लागते.आंतरराष्ट्रीय राजकारणात बलाढय राष्ट्राच्या दबावामुळे कतारने एलएनजी युरोपला मोठया प्रमाणात दिले तर त्याचा फटका भारतीय अर्थव्यवस्थेवर पडेल.या बाबीचा विचार करता भारताने नैसर्गिक वायु व खनिज तेलाची उत्पादन क्षमता वाढविण्यावर भर दिल्यास युध्दाच्या परिणामामुळे एक शक्यता भारताकडे उपलब्ध राहिल.एलएनजी पुरवठा करणाऱ्या देशांशी भारताने केलेले करार दीर्घकालीन असले तरी युध्दाचा संभाव्य धोका लक्षात घेता भविष्यकालिन संकटाशी पर्याय म्हणून याकडे बघता येईल.

**रशिया युक्रेन युध्द व भारतीय अर्थव्यवस्था –**

आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी जगात अनेक संघटना कार्यरत आहेत. ठरवून दिलेले नियम व करारानुसार प्रत्येक देश एक दुसऱ्याशी व्यापार करतो.आयात निर्यातीच्या धोरणामुळे अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्याचे प्रयत्नही याद्वारे केले जाते.भारत हा कृषीप्रधान देश असला तरी व्यापार, उद्योग, व्यवसाय, कारखाने, तंत्रज्ञान यासाठी लागणारा कच्चामाल अनेक शेजारच्या देशांद्वारे प्राप्त करुन देशातील लोकांच्या गरजा व जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्नशील असतो.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत डॉलरचे वाढलेले भाव भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारे आहे. भारत हा तेलाची ८५ टक्के आयात आखाती देश व रशियाकडून करतो.इलेक्ट्रॉनिक्सचे साहित्य, ऑटोमोबाईलचे काही सुटे भाग, रंग तयार करण्याचे तेल अन्य राष्ट्राकडून खरेदी करतो.रशिया या देशातून मोठया प्रमाणात नैसर्गिक वायुची ५६ टक्के आयात करतो.प्रमुख निर्यातदार देश म्हणून युक्रेन

Research Hub International Journal

व रशियाकडून गव्हाची मागणी करतो.पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या खते व नौदलात उपयोगी असणारे टर्बाईन युक्रेन भारताला पुरवितो. रशिया भारताला काही धातू, मौल्यवान खडे व मोती यांचा पुरवठा करतो.त्याचा वापर फोन आणि संगणकात केला जातो.भारताच्या संरक्षणात यंत्रणेला आवश्यक असणारी लढावू विमाने,तांत्रिक उपकरणे रशियाकडून मागवितो.जगात सूर्यफुलाच्या तेलासाठी अग्रणी असलेल्या युक्रेनकडून ८० टक्के तेल आयात करतो.जागतिक स्तरावर जीवनावश्यक वस्तू, पंखे,शिवणयंत्रे यासाठी लागणारा पुरवठा मागणीपेक्षा कमी दिसून येतो.त्याचा परिणाम अनेक वस्तुंचे वधारलेले भाव व महागाईत झालेली वाढ यावर दिसुन येतो. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था विस्कळीत होवून महागाईच्या चक्रव्युहात फसतांना दिसते.

रशिया व युक्रेन युध्दामुळे या वस्तूंच्या आयात निर्यातीवर प्रभाव पडुन भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत असले तरी निर्यातदार, लोकांची क्रयशक्ती व उत्पादनाच्या क्षमतेतील होणारी भविष्यकालिन वाढ या संधीची उपलब्धताही दिसून येईल.

**संदर्भ :**


- दत्त एवं महाजन : भारतीय अर्थव्यवस्था, वर्ष २०२१
- Jhon Farndon : word Geography]miles Kelly publishing ltd.Briton.2001
- मिश्र निरंजन : क्षेत्रीय भूगोल,राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी,जयपूर,१९९४
- पुरी एवं मिश्र : भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन,पूणे, २०१५
- रसाळ राजेंद्र : भारतीय अर्थव्यवस्था, सक्सेस प्रकाशन,पूणे,वर्ष २०१६
- सवदी ए.बी. : भारताचा समग्र भूगोल, २०१०
- वर्तमान पत्रे : लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, मार्च—एप्रिल—मे २०२२
- https://www.mahamtb.com/auther/shashank gulgule.html
- https://www.mahamtb.com/ency/2022


Research Hub International Journal